# कोटेशन

**कामाचे नाव :-** मतदार जागृतीसाठी पथनाट्य करणे.

**कामाचे स्वरूप :-** पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१२ करीता पुणे महानगरपालिका क्षेत्रात १४ क्षेत्रिय कार्यालयअंतर्गत असलेल्या परिसरातील सार्वजनिक ठिकाणे, बस स्थानके, लोकवर्दळीची ठिकाणे इत्यादी ठिकाणाच्या मतदारांमध्ये जन जागृती होण्यासाठी पथनाट्य सादर करणे.

पथनाट्य सादर करणाऱ्या संस्थेने निवडणूक कार्यालयाकडे असलेले एका प्रयोगाचे मानधन, कलाकाराची संख्या, क्षमता, अनुभव तसेच या क्षेत्रात केलेल्या कामाचा पूर्वानुभव यासह सिलबंद दरपत्रके सादर करावयाची आहेत.

**<u>अटी, शर्ती व सूचना :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १. संविदा स्विकारण्याची मुदत | : | दिनांक ०८/०२/२०१२ ते दिनांक ०८/०२/२०१२ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी (सकाळी ११ ते दु. २ पर्यंत) |
| २. संविदा स्विकारण्याचे ठिकाण | : | निवडणूक कार्यालय, सावरकर भवन, शिवाजीनगर, पुणे. |
| ३. संविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण | : | दिनांक ०८/०२/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. निवडणूक कार्यालय, सावरकर भवन, शिवाजीनगर, पुणे. |

**<u>संविदेमध्ये खालील पुर्तता करणे आवश्यक आहे.</u>**

- पथनाट्यामध्ये समावेश असलेल्या पुरूष व स्त्री कलाकारांची संख्या.
- पथनाट्यामध्ये वापरण्यात येणारी यंत्रसामग्री वादके इ. चा समावेश स्पष्ट करावा.
- ठेकेदाराने दरपत्रके मोहरबंद लिफाफ्यात घालून निवडणूक कार्यालय, तिसरा मजला, सावरकर भवन, शिवाजीनगर, पुणे-०५ येथे संविदा स्विकारण्याचे दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत दाखल करावी.
- आयकर/विक्रीकर/एक्साईज/व्हॅट/कामगारांसंबंधी कायदे/विमा या संदर्भातील आवश्यक त्या कायद्याचे कसोशीने पालन संबंधित ठेकेदाराने करणे आवश्यक राहील. त्याची तोशिस पुणे मनपावर राहणार नाही.
- पथनाट्याद्वारे सादरीकरणाची जनजागृतीपर माहिती 'मतदार जागृती अभियान कक्ष' कार्यालयाकडून उपलब्ध करून दिले जाईल.
- पथनाट्य सादरीकरणाच्या ठिकाणी स्वत:चे खर्चाने जावे लागेल.
- संविदा स्वीकारणे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क मा. निवडणूक अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत. इतर कामांपेक्षा या कामाचे स्वरूप वेगळे असल्यामुळे या कामातला पूर्वानुभव आणि अपेक्षित रक्कम या तिन्हीचा विचार करून निविदा मंजूर केली जाईल.